ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# अहेरी तालुक्यातील जलयुक्त शिवाराची उपयुक्तता

**प्रा. नागसेन नामदेव मेश्राम**
भूगोल विभाग प्रमुख
श्री. शंकरराव बेझलवार कला वाणिज्य
महाविद्यालय, अहेरी

## सारांश Abstract :

*महाराष्ट्र राज्याच्या काही भागात दरवर्षी उन्हाळयात पाण्याची समस्या निर्माण होत आहे त्यासाठी टूकरव्दारे पाणी पुरवठा करावा लागतो म्हणून मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त षिवाराची संकल्पना पुढे आणली. त्यामुळे परंपरागत उपलब्ध असलेले जलस्त्रोत षोधून काढून त्याचा विकास केल्यास पावसाचे पडणारे पाणी परंपरागत पध्दतीने साठवून परिसरामध्ये होणारी पाणी टंचाई दूर करता येईल यासाठी या संकल्पनेला पूर्ण करण्यासाठी जनजागृती करण्याच्या दृश्टीने अहेरी तालुक्यात सुध्दा जलयुक्त षिवाराअंतर्गत काही कामे केली आहेत. पडणारे पाणी पूर्णपणे वाहून न जाता ते जमिनीत मुरले पाहिजे त्यामुळे भूमिगत पाण्याच्या पातळीत वाढ होईल व जमिनीवर पाणी साठून राहिल या हेतूने हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानामुळे पाणी टंचाईवर मात करता येईल. उपलब्ध असलेले व निकामी झालेले बंधारे, गाव तलाव, पाझर तलाव, सिमेंट बंधारे इत्यादी जलस्त्रोताची साठवण क्षमता वाढविणे. नदी नाल्यातील गाळाचा उपसा करणे, पाण्याचा वापर योग्य त्या पध्दतीने करणे यासाठी या अभियानाची उपयुक्तता वाढत आहे.*

## बिजसंज्ञा Keywords :

जलयुक्त शिवार, गावतलाव, बंधारे, कोल्हापूरी बंधारे, मामा तलाव.

## प्रस्तावना Introduction :

महाराष्ट्र राज्यामध्ये 82 टक्के शेती कोरडवाहू असून मागील काही वर्षापासून महाराष्ट्र राज्यामध्ये सततचा अनियमित स्वरुपाचा पाऊस पडत असल्यामुळे दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली जिल्हयात जंगलाचे प्रमाण जास्त पर्जन्याचे प्रमाणही जास्त आहे. बारमाही वाहणाऱ्या नदया आहेत तरी सुध्दा काही भागात दुष्काळाचा सामना करावा लागतो. त्यासाठी जलयुक्त शिवाराच्या माध्यमाने कामे करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये आतापर्यत जो पाऊस झालेला आहे. त्यामुळे पाण्याची साठवणूक क्षमता वाढली आहे. खरे पाहता यावर्षी पाऊस सुध्दा अगदी वेळेवर येत असल्यामुळे भूमिगत पाण्याची पातळी वाढलेली आहे. अहेरी तालुक्यात काही निवडक गावामध्ये जलयुक्त शिवाराची योजना राबविण्यात येत आहे. यासाठी कृषी विभाग, वनविभाग, पंचायत समिती, जि.प. सिंचाई विभाग, लघु सिंचन जलसंधारण विभाग, सामाजिक वनीकरण या विभागाकडून हे अभियान यशस्वी करण्यात येत आहे. स्थानिक तलाठी, ग्रामसेवक, वनविभागाचे कर्मचारी प्रत्यक्ष गावभेटी देऊन “मागेल त्याला शेततळे” देण्याची योजना राबविण्यात येत असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे. लोकसहभागातून जनसमुहातून तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून ही योजना पूर्ण करण्यात आहे. या जलयुक्त शिवाराची काही प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

1. पावसाचे पाणी गावाच्या शिवारात अडविणे.
2. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
3. अहेरी तालुक्यातील सिंचन क्षेत्रात वाढ करुन शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ करणे, सर्वाना पुरेसे पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती निर्माण करणे.
4. भूजल अधिनियमाची अंमलबजावणी करणे.
5. विकेंद्रित पाणी साठा निर्माण करणे.
6. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे.
7. अस्तित्वात असलेली व निकामी झालेले बंधारे, गाव तलाव, मामा तलाव, पाझर तलाव, सिमेंट बंधारे इत्यादी जलस्त्रोतांची क्षमता वाढविणे.
8. जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून पाणी साठा वाढविणे.

9. पाण्याच्या ताळेबंधाबाबत आणि कार्यक्षम वापराबाबत प्रभावी जनजागृती तसेच वृक्षलागवडीला प्राधान्य देणे.

10. नदीतील अवैध वाळू उपसा बंद करणे.

वरील दहा उद्देश घेऊन अहेरी तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

**स्थान व विस्तार**

महाराष्ट्राच्या ईशान्य दिशेला असलेला गडचिरोली जिल्हा चंद्रपूर जिल्हयातून 26 ऑगस्ट 1982 पासून वेगळा झाला आहे. या जिल्हयात एकूण 12 तालुके आहेत तर दोन उपविभाग आहेत. अहेरी उपविभागात 5 तालुके आहेत. यामध्ये अहेरी, भामरागड, एटापल्ली, मुलचेरा, सिरोंचा यांचा समावेश होतो त्यापैकी अहेरी तालुका हा सर्वात मोठा तालुका आहे. या तालुक्याचे स्थान $18^0 56^|$ ते $19^0 33^|$ उत्तर ते $79^0 53^|$ पूर्व ते $80^0 23^|$ पूर्व रेखांशाच्या दरम्यान असून या पूर्वेला छत्तीसगड राज्याची सिमा आहे. पश्चिमेला प्राणहिता नदीमुळे तेलगांना राज्याची सिमा आहे. उत्तरेला मुलचेरा व एटापल्ली तालुका आहे तर दक्षिणेला सिरोंचा तालुका आहे. या तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 1650 चौ. किमी. आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा तालुका आहे. तालुक्यातील सिंचन क्षेत्र 1481.38 हेक्टर आहे. प्राणहिता नदी, दिना नदी, रामनाला, लक्ष्मणनाला, गडअहेरी नाला, मुत्तापूर नाला, चेरपल्ली नाला हे सर्व मोठे नाले असून लहान मोठे ओढे प्रवाह आहेत. प्रत्येक गावात लहान मोठे शेततळे आहेत. अहेरी येथे माजी मालगुजारी तलावाची संख्या दोन आहे. लहान तलाव व मोठा तलाव आत्राम परिवारातील हा तलाव पूर्णपणे अम्ब्रिशराव आत्राम, आदिवासी विकास व वन राज्यमंत्री तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा यांच्या मालकीचे आहे. आलापल्ली, पेरमिली, जिमलगटटा, उमानुर, व्यंकटापूर, देवलमरी, इंदाराम, महागाव, बोरी येथे मोठे तलाव आहेत. या आधारे शेतीला पाणी पुरवठा केला जातो. संपूर्ण तालुका जंगलव्याप्त प्रदेशाने व्यापलेला आहे. आतमध्ये वनविभागाने लहान लहान पाणवठे तयार केले आहे. त्यावर जंगलातील प्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते. या तालुक्यात सरासरी पर्जन्यमान 1200 मी. आहे. एकूण लोकसंख्या 1,10000 आहे. यामध्ये पुरुषांची संख्या 58000 तर स्त्रियांची संख्या 52000 आहे. या तालुक्यात अनुसूचित जनजातीचे प्रमाण सर्वाधिक असून गोंड, माडिया, बडा माडिया, छोटा माडिया, मादगी, महार, मांग, कापेवार, सालेवार, बेलदार, कुणबी, कोमटी या जातीचे लोक राहतात. 18 पगड जातीचा समावेश या तालुक्यात असून सोनार, चांभार, लोहार, सुतार, शिंपी, धोबी, न्हावी, मुस्लीम व धर्मातरित ख्रिश्चन या भागात राहतात. शेती व्यवसाय करणारे कुणबी, महार, गोंड, बडा माडिया, छोटा माडिया, परधान या जातीचे लोक या व्यवसायात आहेत. काही मोठे शेतकरी तर काही मध्यम शेतकरी आहेत. अहेरी जमिनदारीचे वारस मा. अंम्ब्रीशराव आत्राम हे सुध्दा शेतकरी असून त्यांचे आत्राम परिवार सुध्दा शेत मालक असून माजी मालगुजारी तलावाचे कायदेशीर भूमिस्वामी आहेत. तलाठी रेकार्डप्रमाणे वर्ग 1 चे मालक म्हणून नोंद आहे.

या तालुक्यात 184 गावे असून 158 आबादी गावे आहेत तर 26 रिठी गावे आहेत. ग्रामपंचायत 40 तर गट ग्रामपंचायत 35 तर 5 गावात फक्त स्वतंत्र ग्रामपंचायत आहे. नव्यानेच अहेरी ग्रामपंचायतीला नगर पंचायतचा दर्जा प्राप्त झाला असून वर्तमान प्रशासक म्हणून तहसीलदार हे काम पाहत आहेत. कृषी विभागातर्फे कृषीची सुधारणा करण्यासाठी शेतीची अत्याधुनिक अवजारे, बैलबंडी, मळणी यंत्र, सुधारित बी–बियाणे पुरविण्यात येते.

जलयुक्त शिवाराअंतर्गत या तालुक्यात 7 गावाचा समावेश करण्यात आलेला आहे. ही गावे खालीलप्रमाणे आहेत.

1) मुत्तापूर 2) मोदूमतुरा 3) मोसम 4) गोलाकर्जी 5) जिमलगटटा 6) गोविंदगाव 7) उमानुर

प्रत्येक गावामध्ये जुने व नविन पाण्याचे परंपरागत स्त्रोत आहेत. त्याच बरोबर नवीन शेततळे तयार करण्यात आले आहे. त्या आधारे या गावातील शेतीसाठी पाणी पुरवठयाची सोय झाली असून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झालेली आहे.

**गृहितकृत्ये Hypothesis :**

अहेरी तालुक्यातील जलयुक्त शिवाराची उपयुक्तता या लघुशोध निबंधासाठी खालील गृहितकृत्ये निर्धारित करण्यात आली आहे.

1. जलयुक्त शिवाराच्या माध्यमाने पाणी साठयात वाढ होत आहे.
2. भूमिगत पाण्याच्या पातळीत वाढ झालेली आहे.

3. शेतकऱ्यांना ओलीताच्या सोयी झालेल्या आहेत.

**संशोधन पध्दती Research Methology :**

वरील लघु शोध निबंधाकरीता खालील संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

1. दुय्यम आकडेवारीच्या सहाय्याने शोध निबंध पूर्ण करण्यात येईल.
2. प्रत्यक्ष मुलाखती, प्रश्नावली व प्रत्यक्ष अवलोकन, क्षेत्रभेटी अहवाल याचा वापर करण्यात आला.
3. नकाशे, स्तंभालेख व विभाजीत वर्तुळाचा वापर करण्यात आलेला आहे.

जलयुक्त शिवार ही महाराष्ट्र शासनाची योजना 2014—15 पासून राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियान हा शासनाचा फ्लॅगशिप प्रोग्रम असून जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उददेश सर्वासाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र 2019 करण्यासाठी व टंचाईवर कायम स्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्द पध्दतीने कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी जलयुक्त शिवार अहेरी तालुक्यातील विविध यंत्रणेच्या माध्यमाने राबविण्यात येत आहे. यासाठी कृषी विभागाची भूमिका व कामगिरी ही फारच मोलाची आहे. कृषी विभाग, वन विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, एकात्मिक वन व्यवस्थापन समिती, लघुसिंचन व जलसंधारण विभाग व इतर सहयोगी विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा अभियान राबविण्यात येत आहे.

**सारणी क्र. 1**

**जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची माहिती**

| | कृषीविभाग | | पंचायत समिती | | वनविभाग | | जि.प. सिंचाई | | लघुसिंचन | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित | पूर्ण | प्रस्तावित | पूर्ण | प्रस्तावित | पूर्ण | प्रस्तावित | पूर्ण | प्रस्तावित | पूर्ण | प्रस्तावित | पूर्ण |
| मुत्तापूर | 22 | 22 | 17 | 17 | 08 | 00 | 03 | 03 | 02 | 02 | 51 | 44 |
| मोदूमतुर्रा | 08 | 08 | 19 | 18 | 08 | 00 | 01 | 01 | 00 | 00 | 36 | 27 |
| मोसम | 14 | 12 | 11 | 09 | 15 | 01 | 01 | 01 | 02 | 02 | 43 | 27 |
| गोलाकर्जी | 10 | 10 | 38 | 06 | 26 | 25 | 01 | 00 | 01 | 01 | 76 | 32 |
| जिमलगटटा | 16 | 15 | 35 | 06 | 29 | 13 | 04 | 02 | 00 | 00 | 84 | 36 |
| गोविंदगाव | 10 | 10 | 32 | 22 | 35 | 13 | 05 | 05 | 02 | 02 | 84 | 52 |
| उमानुर | 07 | 07 | 14 | 10 | 44 | 13 | 04 | 03 | 01 | 01 | 70 | 34 |
| एकूण | 87 | 84 | 166 | 88 | 165 | 65 | 19 | 15 | 08 | 08 | 444 | 252 |

तालुका कृषी अधिकारी, अहेरी

**स्पष्टीकरण :** वरील सारणी क्र. 1 वरुन असे स्पष्ट होते की ज्या गावाची निवड करण्यात आली आहे. त्या गावात प्रत्यक्ष झालेल्या कामाची व प्रस्तावित कामाची आकडेवारी देण्यात आली आहे.

1) मुत्तापूर : हे गाव अहेरी मुख्यालयापासून 12 किमी. अंतरावर असून या गावाशेजारी एक मोठा नाला आहे. त्या आधारे या गावातील शेतकऱ्यांनी विविध कामांची मागणी केली असून त्यामुळे पाण्याच्या साठवणुकीत वाढ होऊन भूमिगत पाण्याची पातळी वाढली आहे. कृषी विभागाकडून प्रस्तावित 22 कामे हाती घेण्यात आली होती ती पूर्ण झाली आहेत. पंचायत समितीकडे 17 कामे दिली होती ती पूर्ण झाली आहेत. वनविभागाचे 08 कामे होती परंतु त्यापैकी एकही काम पूर्ण झालेली नाहीत. जिल्हा परिशद सिंचाई विभागाकडे 3 कामे देण्यात आली होती त्यापैकी 2 कामे पूर्ण झालेली आहेत. लघुसिंचन व जलसंधारण विभागाकडे 2 कामे देण्यात आली होती त्यापैकी 2 कामे पूर्ण झाली आहेत. एकूण 52 कामापैकी 44 कामे पूर्ण झालेली आहेत. यामध्ये विहिरी खोदणे, बोडी बांधणे, शेततळे तयार करणे, नाल्यावर बंधारा बांधणे, नाल्यावरील बंधाऱ्यातून लहान कालवे तयार करुन नाल्याचे पाणी शेतीकडे वळविणे इत्यादी कामाचा समावेश आहे.

2) मोदूमतुर्रा : हे गाव अहेरी मुख्यालयापासून 12 किमी. अंतरावर प्राणहिता नदीच्या काठावर वसलेले असून पावसाळयात या गावाला पूराचा धोका असतो तसेच शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडून 8 कामे मागीतली होती ती पूर्ण झाली आहेत. उपसभापती कंकडालवार यांचे निर्वाचन क्षेत्रातील गाव असून पंचायत समिती अंतर्गत 19 कामे देण्यात आली होती त्यापैकी 18 कामे पूर्ण झाली आहेत. वन विभागाचे 8 कामे होती परंतु वनक्षेत्राचे प्रमाण कमी असल्याने तसेच विभागीय वन अधिकाऱ्यांकडे इतर कामे असल्यामुळे हे काम पूर्ण झाले नाही असे सांगण्यात आले आहे.

3) मोसम : हे गाव आलापल्ली सिरोंचा मुख्य महामार्गावर असून अहेरी तालुका मुख्यालयापासून 25 किमी. अंतरावर आहे. या गावाच्या जवळून मोठा नाला वाहतो. जंगलव्याप्त प्रदेश तसेच एक माजी

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

मालगुजारी तलाव आहे. एकूण प्रस्तावित कामे 41 होती त्यापैकी 27 कामे पूर्ण झाली आहेत. कृषी विभागाकडून 12 कामे व पंचायत समितीकडून 9 कामे पूर्ण झाली आहेत. तसेच वनविभागाकडून 15 पैकी 1 काम पूर्ण, जि.प. सिंचाई कडून 1 पैकी 1 काम पूर्ण, लघुसिंचन कडून 2 पैकी 2 कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

4) गोलाकर्जी : हे गाव सिरोंचा मुख्य रस्त्याला लागूनच असून जंगलव्याप्त प्रदेशातून वाहणारा नाल्यावर बंधारा बांधून पाणी अडविण्यात आले आहे. एकूण कामे 76 असून त्यापैकी 32 कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये वनविभागाचे काम सर्वाधिक असून प्रस्तावित 16 पैकी 15 कामे पूर्ण झाली आहेत.

5) जिमलगटटा : हे गाव आलापल्ली सिरोंचा मुख्य रस्त्यापासून उत्तरेला 3 किमी. अंतरावर असून संपूर्ण जंगलव्याप्त प्रदेष आहे. जंगलाचे प्रमाण जास्त तसेच जंगलाला लागूनच शेततळे, लहान बोडी, वाहणाऱ्या नाल्यावर बंधारे बांधण्यात आली आहेत. वन विभागाचे एकूण कामे 10 पैकी 10 कामे पूर्ण झालेली आहेत.

6) गोविंदगाव : हे गाव आलापल्ली सिरोंचा मार्गावर अहेरी मुख्यालयापासून 20 किमी. अंतरावर आहे. एकूण प्रस्तावित कामे 84 असून 52 कामे पूर्ण झाली आहेत. येथे पंचायत समिती कडून 32 कामापैकी 22 कामे पूर्ण झालेली आहेत. वन विभागाची 13 कामापैकी 5 कामे पूर्ण झाली असून उर्वरित 8 कामे सुरु आहेत. कृषी विभागाकडून एकूण 10 पैकी 10 कामे पूर्ण झालेली आहेत. जि. प. सिंचाई विभागाचे 5 पैकी 5 कामे पूर्ण झालेली आहेत. लघुसिंचन जलसंधारणाची 2 कामे असून 2 कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये शेततळे व लहान बोडी यांचा समावेश आहे. शेततळे व बोडयामध्ये मासे संवर्धन केंद्र निर्माण करण्यात आले आहे.

7) उमानुर : हे गाव आलापल्ली सिरोंचा रस्त्यावर मुख्यालयापासून 30 किमी. अंतरावर असून या गावाजवळून मोठा नाला वाहतो. त्या नाल्यावर 6 ठिकाणी बंधारे बांधण्यात आले असून त्या आधारे शेतीला पाणी पुरवठा केला जातो. या गावात 70 कामे प्रस्तावित असून 34 कामे पूर्ण झाली आहेत. यामध्ये कृषी विभागाचे 7 पैकी 7 कामे पूर्ण झाले आहेत. तर पंचायत समितीचे 14 पैकी 10 कामे पूर्ण झालेली आहेत. वन विभागाचे सर्वाधिक कामे 44 असून त्यापैकी 13 कामे पूर्ण झालेले आहेत. यामध्ये जंगलात शेततळे तयार करणे, लहान बंधारे तयार करणे, जंगलातील वाहून जाणारी माती यांचे संवर्धन करणे, ज्ब्ड च्या नाल्या काढणे व जंगलातील रस्ते तयार करणे, पांदण रस्ता पूर्ण करणे या कामाचा समावेश आहे.

**सारणी क्र. 2**
**खर्चाचे वितरण**

| अ. क्र. | गावाचे नाव | प्रस्तावित खर्च | झालेला खर्च | कामाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | मुत्तापूर | 169.80 | 86.83 | 84.62 : |
| 2 | मोदूमतुर्रा | 71.67 | 32.78 | 75: |
| 3 | मोसम | 121.04 | 70.08 | 65.85 : |
| 4 | गोलाकर्जी | 183.12 | 52.46 | 42.11 : |
| 5 | जिमलगटटा | 142.42 | 53.86 | 42.86: |
| 6 | गोविंदगाव | 159.10 | 128.69 | 61.90: |
| 7 | उमानुर | 169.11 | 76.57 | 48.57 : |

तालुका कृषी अधिकारी, अहेरी

**स्पष्टीकरण :** वरील जोडस्तंभालेखामध्ये व सारणी क्र. 2 मध्ये अहेरी तालुक्यातील पहिल्या टप्प्यातील जलयुक्त शिवारासाठी खर्चाचे विवरण स्पष्ट करण्यात आले आहे. यामध्ये प्रस्तावित खर्च व प्रत्यक्ष झालेला खर्च दर्शविण्यात आलेला आहे. निवड झालेल्या सात गावापैकी मुत्तापूर येथे 169.80 प्रस्तावित खर्च होता. परंतु 86.83 खर्च झालेला आहे. मोदूमतुर्रा येथे 71.67 लाख रुपये प्रस्तावित खर्च होता. परंतु 32.78 लाख रुपये खर्च झालेले आहे. मोसम येथे 121.04 लाख रुपये मंजूर खर्चापैकी 70.08 लाख रुपये खर्च झालेला आहे. गोलाकर्जी येथे प्रस्तावित खर्च 183.12 लाख रुपये होता परंतु प्रत्यक्ष 52.46 लाख खर्च झालेला आहे. जिमलगटटा येथे 142.42 रुपये प्रस्तावित खर्चापैकी 53.86 लाख रुपये खर्च झालेले आहे. उमानुर येथे प्रस्तावित खर्च 169.11 लाख रुपये होता त्यापैकी 76.57 लाख रुपये खर्च झालेला आहे. वरील खर्च हा महाराष्ट्र शासन, स्वंयसेवी संस्था, रिलायन्स एनर्जी यांच्याकडून संबंधित विभागाला देण्यात आला होता त्यापैकी कृषी विभाग व वन विभागाचे काम व्यवस्थीत असून इतर विभागाकडे कामाची संख्या जरी कमी असले तरी पाहिजे त्या प्रमाणात काम झालेले नाही. तरी जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमाने जल संधारण, जलपूनरभरण, भूमिगत पाण्याच्या पातळीत वाढ झालेली आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**सारणी क्र. 3**
**अहेरी तालुक्यातील पूर्ण झालेल्या जलयुक्त शिवाराची गावानिहाय वितरण**

| अ. क्र. | गावाचे नाव | कामाची टक्केवारी | एकूण टक्केवारी | कोनात्मक किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | मुत्तापूर | 82 | 19.75 | $70^0$ |
| 2 | मोदूमतुर्रा | 75 | 18.07 | $65^0$ |
| 3 | मोसम | 65 | 15.66 | $56^0$ |
| 4 | गोलाकर्जी | 42 | 10.13 | $37^0$ |
| 5 | जिमलगटटा | 42 | 10.13 | $37^0$ |
| 6 | गोविंदगाव | 61 | 14.69 | $53^0$ |
| 7 | उमानुर | 48 | 11.57 | $42^0$ |
| | | 415 | 100 | $360^0$ |

Source : Computing by Researchers




**स्पष्टीकरण** : वरील सारणी क्र. 3 व विभाजीत वर्तुळावरुन असे दिसून येते की, अहेरी तालुक्यातील जलयुक्त शिवाराअंतर्गत ज्या गावाची निवड करण्यात आली त्या गावातील पूर्ण झालेल्या कामाचा तपशिल देण्यात आलेला आहे. सर्वाधिक कामे मुत्तापूर येथे 19.75 टक्के असून एकूण तालुक्यातील कामापैकी सर्वाधिक कामे या गावात झालेली आहे. त्या खालोखाल मोदूमतुर्रा येथे एकूण तालुक्यातील कामापैकी 18.07 टक्के कामे पूर्ण झाली आहेत. मोसम येथे 15.66 टक्के एकूण तालुक्यातील कामापैकी पूर्ण झालेली आहेत. गोविंदगाव येथे 14.69 टक्के गोलाकर्जी व जिमलगटटा येथे सारखीच कामे म्हणजे 10.13 टक्के पूर्ण झालेली आहेत तर उमानुर येथे 11 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत.

**निष्कर्ष** :

वरील सर्व आकडेवारीवरुन व आकृतीवरुन असे स्पष्ट होते की, अहेरी तालुक्यातील पहिल्या टप्प्यातील कामाची स्थिती समाधानकारक आहे. यावर्षी पर्जन्याचे प्रमाण तसेच नियमितपणा यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी जलसाठयामध्ये वाढ झालेली असून सर्वत्र जमा झालेले पाणीच पाणी दिसून येत आहे. म्हणजेच जलयुक्त शिवाराची उपयुक्तता सिध्द झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ** :

1. योजना मासिक जुलै 2016
2. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन
3. डॉ. प्रदिप आगलावे संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर
4. डॉ. विठठल घारपूरे सामाजिक व सांस्कृतिक भूगोल विद्या प्रकाशन, नागपूर
5. ग्राम विकास कार्यक्रमाची एक झलक ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

6. सामान्य भूगोल गडचिरोली जिल्हा महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पूणे
7. पंचायत समिती, अहेरी वार्षिक अहवाल
8. कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, तालुका अहेरी
9. Intalectualua's (2004) Sandharbha Maharashtra State and Districties a Glance Volume II
10. Aijaruddin Ahemad Social Geography Rawat Publication, Jaipur & New Delhi